# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १२१-२२** **दिनांक :- २८/०४/२०२२**

## राष्ट्रीय हायवेलगत सुटकेसमध्ये मिळुन आलेल्या पुरुष जातीच्या मृतदेहाची ओळख पटवुन अवघ्या २४ तासात ०५ आरोपींना अटक करुन खुनाच्या गुन्हयाची उकल.

वालीव पोलीस ठाण्यात दिनांक १६/०४/२०२२ रोजी तक्रारदार श्री. दिपक अमरजी बलई यांनी खबर दिली की, त्यांचे वडील नामे अमरजी गममीरा बलाई हे दिनांक १२/०४/२०२२ रोजी रात्री ०८:०० वा. पासुन बेपत्ता झाले आहेत. त्यावरुन वालीव पोलीस ठाणे येथे मनुष्य मिसिंग नं.७५/२०२२ प्रमाणे नोंद करण्यात आली होती.

सदर मनुष्य मिसिंगमध्ये तपास चालु असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अमोल राठोड व त्याचे साथीदार यांनी अज्ञात कारणावरुन इसम नामे अमरजीत बलई यांचा खुन करुन पुरावा नष्ट होण्याचे दृष्टीने मृतदेह मुंबई-गुजरात राष्ट्रीय हायवे लगत वासमाऱ्या ब्रिज जवळील झुडुपात सुटकेसमध्ये भरुन फेकुन दिला आहे. सदरबाबत खात्री केली असता बातमीप्रमाणे मृतदेह मिळुन आल्याने मनुष्य मिसिंग तपासी अंमलदार पोहवा/०६०७६ महेश बोडके यांनी खबर दिल्यावरुन वालीव पोस्टे येथे गुन्हा रजि.नं.४५८/२०२२ भारतीय दंड संहिता कलम-३०२, २०१, ३४ प्रमाणे दिनांक २६/०४/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखा व मध्यवर्ती गुन्हे कक्ष मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय असे दोन समांतर तपास पथके तयार करण्यात आली. गुन्हयाचे तपासात माहिती मिळून आली की, आरोपी दिनेश कन्हैलाल चोबीसा व मयत या दोघांमधे कामण–भिवंडी रोडवर सागर हॉटेल समोर असलेल्या चहाच्या दुकानाचे व्यवहारातुन दोघांमध्ये गेले ०६ महिन्यांपासून वाद होत होते. याच गोष्टीचा आरोपीने मनात राग धरुन त्याचा साथीदार अमरजी गममीरा बलाई (मयत) यांचा खून करण्याचे ठरविले होते. त्यादृष्टिने आरोपी १) दिनेश कन्हैलाल चोबीसा याने आरोपी २)विशाल भिमु आडे याचे सोबत गुन्हयाचा कट रचुन आरोपी ३) कपिल चंदु राठोड ४) अमोल चंदु राठोड व ५) लक्ष्मण नान्नु पवार यांना चहा हॉटेल मालक अमरजी गममीरा बलाई (मयत) यास जिवे ठार मारण्याची सुपारी दिल्यावरुन दिनांक १२/०४/२०२२ रोजी अमरजी बलाई यांचा खुन करुन मृतदेह नष्ट करण्याच्या हेतुने राष्ट्रीय हायवे लगत झुडुपात बॅगेत भरुन फेकुन देण्यात आला अशी प्रथम दर्शनी माहीती समोर आली आहे.

गुन्हयातील आरोपी क्र ३) कपिल चंदु राठोड ४) अमोल चंदु राठोड व ५) लक्ष्मण पवार यांना पोलीसांनी कलबुर्ग (कर्नाटक) येथुन ताब्यात घेतले असुन आरोपी दिनेश यास कामण येथुन तर आरोपी विशाल आडे यास भिवंडी येथुन ताब्यात घेतले आहे. आरोपींनी गुन्हयाची कबुली दिली असुन गुन्हा दाखल झाल्यापासुन अवघ्या २४ तासात गुन्हयाची उकल करुन सर्व आरोपींना दिनांक २८/०४/२०२२ रोजी अटक केली आहे.

वरील कामगिरी श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. अमोल माडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक श्री. राहुल राख नेम-मध्यवर्ती गुन्हे कक्ष, वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोउनिरी/राजेंद्र साबळे, गुन्हे शाखेचे पोउपनी बेंद्रे व अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.